Leading Towards Light
SURAJ FOUNDATION

# KVS Whispering valley

News letter of Nav Krishna Valley School's & Jr. College, A School with difference

Monthly Newsletter Vol.-1 Issue : 5 January-2022



Adv.Geetanjali Patil-Deshmukh
HR Manager SF

Hello my dear friends,

Wishing you a very happy new year, make yourself concise, measurable and realistic. This New Year's resolutions are to focus on a healthy diet, learn rather memories, speak up if you do not understand, summaries each class in three sentences, be more helpful to your classmates, join more student clubs and ignore distractions."

- Focus on a Passion, Not the Way You Look
- Go environment friendly
- Work out to feel good, not to be thinner.
- Give one compliment per day.
- Do Random Acts of Kindness.
- Read a book Every month.
- Go to someplace you've never been.
- Get organized.
- Learn new skills or hobby.
- Read more.
- Play outdoor games

This is just a exemplary list. Now you Can make your own resolutions as well..

Once again a Very Happy New Year 2022..

## A word from your Principal ( Vijaynagar )



श्री. सुनिल चौगुले

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की आमच्या संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री प्रवीणशेठ लुकंड यांच्या मार्गदर्शनातून सुरज फौंडेशन 'नव कृष्णा व्हॅली स्कूल' च्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवनवीन अत्याधुनिक शिक्षण देण्याचा प्रयत्न असतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी हा यामागिल हेतु आहे. सांगली जिल्ह्यातील अशी एकमेव शाळा आहे जिथे Whitehat Jr Coding चे वर्ग शिकवले जातात ,याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे .

प्रत्येक विद्यार्थ्याला यश मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासू, विचारशील तरुण बनण्यासाठी सर्वोत्तम संधी देऊ करतो, जेणे करुन भविष्यातील कोणत्याही आव्हानांसाठी सामोरे जाण्यास कोणतीही अडचण येणार नाही यांची आम्ही काळजी घेत असतो .

शिक्षण ही केवळ भविष्यातील नोकरीसाठी ज्ञान देण्याची प्रक्रिया नाही, तर आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे जी एखाद्याच्या जीवनाला योग्य मार्गावर नेण्यासाठी नैतिक मूल्यांची समज निर्माण करते. एक पालक म्हणून, तुम्हाला तुमच्या मुलासाठी सर्वोत्तम हवे आहे आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांना योग्य ज्ञान दिले जाईल याची खात्री करण्यासाठी तुमच्यासोबत काम करताना आम्हाला अभिमान वाटतो. पालक, विद्यार्थी आणि शाळेचे शिक्षक हे एकसंघ आहेत आणि ते एकमेकांच्या प्रयत्नांना पूरक आहेत .

## Happy New Year



Surround yourself with people that push you to do better. No drama or negativity. Just higher goals and higher motivation. Good times and positive energy. No jealousy or hate. Simply bringing out the absolute best in each other.

## What is Inside


- Editorial
- A word from your principal
- Teacher Interview
- Sports
- Alumni connect
- Talent uncovered
- Activities of students



सौ. ललिता स्नेहल गौंडाजे

NAV KRISHNA VALLEY SCHOOL

**"शाला वंदना नमस्ते .....नमस्ते ......नमस्ते ।"** ज्या विद्यालयात मी शिक्षिका म्हणून कार्यरत आहे ,त्या शाळेची महती सांगते. "ज्ञानदाने परो नित्य, नगरस्यास्य विभूषणम् । नव कृष्णा विद्यालयोऽयं कुपवाडनगरे विशोभते ॥ "

ज्ञानदानामध्ये नेहमी श्रेष्ठ व तत्पर असलेले, या नगराचे भूषण असलेले, हे ' नव कृष्णा व्हॅली स्कूल ' विद्यालय कुपवाड नगरीमध्ये शोभून दिसते

**१) आपणाला शिक्षिका व्हावे असे का वाटले?**

आज समाजामध्ये डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पैसेवाले व उच्चपदस्थ व्यक्ती या शिकलेल्या लोकांना खूप मोठा मान असतो. त्यामानाने शिक्षकांना मान कमी मिळतो. तरीसुद्धा मला शिक्षिकाच व्हावे असे मनापासून वाटले. कोणावर माझा दोषारोप नाही पण सद्यस्थिती व वस्तुस्थिती तशी आहे. अनेक व्यवसायांमध्ये पैसे कमवायचे मार्ग भिन्न आहेत . वाम मार्गाने मिळालेला अर्थ (पैसा) अनर्थाला( संकटाला ) कारणीभूत ठरतो. पण शिक्षकी हा एकच प्रश्न असा आहे की ,ज्यामध्ये वाममार्गाने अन्यायाने पैसा मिळविता येत नाही .पगाराच्या माध्यमातून न्यायमार्गाने मिळालेला ,कष्टाने कमावलेला पैसा सत्कारणी लागतो. हा आदर्श समाजाने घ्यावा म्हणून समाजाचे घटक, भावीपिढी, भावी नागरिक बनणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात हे चांगले संस्कार रुजविण्यासाठी मी शिक्षिका झाले. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा आरसा असतो, विद्यार्थी या आरशातील प्रतिबिंब असतो ,विद्यार्थ्यांमध्ये सन्मार्गाचे व स्वच्छ चारित्र्याचे प्रतिबिंब उमटविण्यासाठी मी शिक्षिका झाले.

**२) शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण अनुभव कोणता?**

"शिक्षण-क्षेत्र" निराळे व "शिक्षकी पेशा " निराळा. शिक्षणाचे क्षेत्र खूप मोठे आहे.त्याची व्याप्तीही मोठी आहे .एकाच संस्थेत एकाच ठिकाणी नोकरी असल्याने विशाल व विस्तृत अशा " शिक्षण क्षेत्रा,"बद्दल बोलणे ,लिहिणे आवाक्याबाहेरचे आहे. ज्या ठिकाणी सेवा करते तिथले अनुभव सांगणे शक्य आहे. शिक्षकाचे आपल्या शिकविण्याच्या घटकावर, विषयावर प्रभुत्व असले ,तर विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात, वाचतात ,अभ्यास करतात. अपुऱ्या तयारीनिशी वर्गातील विद्यार्थ्यांना पुढे नेणे ,हा आत्मघातच होय. शिकविताना शैक्षणिक साधनांचा वापर, हा विद्यार्थ्यांचे अध्यापनाकडे लक्ष आकर्षित करण्याचा महत्त्वाचा भाग आहे.

वर्गांमध्ये विविध धर्माचे ,जाती- पंथाचे ,गरीब-श्रीमंत- मध्यम वर्गाचे विद्यार्थी असतात, त्या सर्वांना एकाच पातळीवर आणून शिकविणे कठीण काम असते .प्रत्येकाचा स्वभाव निराळा असतो. भांडकुदळ ,चिडका, शांत,अबोल ,बडबड्या ,खोडकर, खेळकर ,आनंदी ,अभ्यासू अशा अनेकविध स्वभावाच्या विद्यार्थ्यांना हाताळणे सोपे नसते.

मुलांच्यात रममाण होणे, त्यांना ज्ञानामृत पाजणे व शिक्षक म्हणून आपल्या बद्दल विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास निर्माण करणे या गोष्टी मी शाळेत ,वर्गात व बाहेरही करते.

**३) विद्यार्थ्यांकडून तुमची काय अपेक्षा आहे?**

अध्यापन व अध्ययन चालू असताना विद्यार्थ्यांनी ते लक्षपूर्वक एकाग्रचित्ताने ऐकले पाहिजे ,ध्यानात ठेवले पाहिजे. सर्वच विद्यार्थी एकपाठी नसतात. परंतु त्यांनी अभ्यास, स्वयंअध्ययन तरी केलेच पाहिजे. "विद्यार्थी"या शब्दाचा अर्थच मुळी (विद्यया अर्थीन इती विद्यार्थी ।) विद्येचा याचक असा आहे . याचक ज्याप्रमाणे घरोघरी, दारोदारी फिरून भिक्षा गोळा करतो, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांकडून मिळणारी ज्ञानाची भिक्षा ,शिदोरीने झोळी भरून घ्यावी अशी अपेक्षा असते. विद्यार्थ्यांनी शाळेत शिस्तीने वागले पाहिजे रोजचा अभ्यास, स्वाध्याय ,गृहपाठ वेळच्या वेळी पूर्ण केले पाहिजे. पाठांतर मग ते कोणत्याही विषयाचे, असो केले पाहिजे .वागण्यामध्ये नम्रता व बोलण्यात शालीनता पाहिजे. आरोग्यविषयक चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत . शाळेतील मित्र- मैत्रिणींबरोबर अदबीने व चांगुलपणाने वागले पाहिजे. शिक्षकांच्या बद्दल सदैव आदर बाळगला पाहिजे. एक वाक्यता दिसण्यासाठी शाळेचा गणवेश वापरला पाहिजे. एकमेकांसोबत सहकार्याची, मदतीची भावना ठेवली पाहिजे.विद्यार्थी हा आज्ञाधारक व विनयशील असलाच पाहिजे. म्हटलेच आहे, " विद्या विनयेन शोभते!" विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व सुविधांचा पुरेपूर उपयोग घेतला पाहिजे. शाळेचे क्रीडांगण, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष यांचा जास्तीत जास्त फायदा घेतला पाहिजे. आपल्या वागण्याने शाळेचे व कुटुंबाचे नाव चांगल्या अर्थाने समाजात घेतले गेले पाहिजे, असे विद्यार्थ्यांचे वागणे असायला हवे.



फुटबॉल

**फुटबॉल नावाचा उगम कुठे झाला? (Where did the name football originate?)**

जर आपण फुटबॉलच्या उत्पत्तीविषयी बोललो तर लोक फुटबॉल या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल भिन्न मते आहेत. फिफाच्या म्हणण्यानुसार, फुटबॉल हा चिनी खेळाचा विकसित प्रकार मनाला जातो, म्हणजेच चीनमध्ये खेळल्या जाणाऱ्या खेळाला सुझू असे म्हणतात, आणि मग त्यातून उत्क्रांत झाले आहे. हा खेळ चीनमधील हयान राजवंशात विकसित झाला होता, असे म्हणतात. जपानमध्ये असुका घराण्याच्या कारकिर्दीत फुटबॉल खेळाला कॅमरी असे म्हणतात. नंतर, 1586 मध्ये, ग्रीनलँडमध्ये जॉन डेव्हिस नावाच्या जहाजाच्या कप्तानच्या कप्तानांद्वारे हा खेळ खेळला होता. 15 व्या शतकात हा खेळ फुटबॉलच्या नावाने स्कॉटलंडमध्ये खेळला जात होता. अशाप्रकारे, फुटबॉल या शब्दाचे मूळ सांगितले होते, म्हणजेच, फुटबॉल खूप पूर्वी खेळला गेला होता परंतु वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या नावांनी ओळखला जात आहे.

**फुटबॉलची ओळख कशी झाली? (How was football introduced?)**

16 व्या शतकात इंग्लंडच्या सार्वजनिक शाळांमध्ये फुटबॉलचे विविध प्रकार खेळण्यात आले होते. इतिहासकारांच्या म्हणण्यानुसार, फुटबॉल क्लबची सुरूवात 1824 मध्ये एडिनबर्ग येथे करण्यात आली. सुरुवातीला क्लब विद्यार्थ्यांनी सुरु केला. त्यातील एक शेफील्ड फुटबॉल क्लब आहे जो एक इंग्रजी फुटबॉल क्लब होता. याची स्थापना 24 ऑक्टोबर 1857 रोजी करण्यात आली. हा जगातील सर्वात जुना सक्रिय फुटबॉल क्लब मनाला जातो. 1862 मध्ये स्थापना झालेल्या इंग्लिश क्लब नॉट्स काउंटी. खेळाचा प्रसार होऊ लागला आणि व्यापाऱ्यांनी फुटबॉलमध्ये रस दाखवला होता. फुटबॉलची पहिली स्पर्धा 1872 मध्ये इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्यात झाली होती. हा खेळ पाहण्यासाठी 4000 लोक गेले होते. खेळ 0-0 ने समाप्त झाला होता. 1883 मध्ये जगातील पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळला गेला ज्यात आयर्लंड, इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्सच्या संघांनी भाग घेतला. अशाप्रकारे, इंग्लंडमध्ये फुटबॉलची भरभराट झाली आणि लवकरच ती युरोपियन खंडात झाली. युरोपबाहेर हा खेळ सर्वप्रथम अर्जेंटिनामध्ये खेळला गेला होता.

**भारताचे फुटबॉलमध्ये पदार्पण (Debut in football in India)**

भारतात क्रिकेट हे जास्त पसंत केले जात आहे, असे म्हणणे चुकीचे नाही. तरीही फुटबॉलने आपले स्थान कायम राखले आहे आणि भारतात फुटबॉलप्रेमींची कोणतीही कमतरता नाही. पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यात फुटबॉल जास्त खेळला जातो. भारत ब्रिटनची वसाहत होति, म्हणून ब्रिटनमधील खेळांनाही भारतात मान्यता मिळाली.

भारतात फुटबॉल लोकप्रिय झाला असेल तर त्यामागे नागेंद्र प्रसाद अधिकारी यांचे योगदान आहे. त्याना भारतीय फुटबॉलचा जनक देखील म्हटले जाते. हा खेळ सर्वप्रथम भारतातील शाळेच्या मैदानात सुरू झाला. नागेंद्र प्रसाद यांनी फुटबॉलच्या वाढीस हातभार लावला आणि त्याने बॉईज क्लबची स्थापना केली. 1880 पर्यंत कोलकातामध्ये अनेक फुटबॉल क्लब तयार झाले. आज फुटबॉल प्रचारामध्ये नागेन्द्र प्रसाद जी यांचा संपूर्ण हात आहे आणि आज फुटबॉलचे भारतात लक्ष आहे. यानंतर नागेनदाई जींनी सोबाबाजार सॉल्ट क्लबची स्थापना केली. 1950मध्ये भारताने वर्ल्ड कपसाठी पात्रता साधली होती, पण वर्ल्ड कपमध्ये जाण्यासाठी भारतीय संघाकडे पैसे नव्हते. त्या काळात विश्वचषकांपेक्षा भारताने ऑलिम्पिकला अधिक महत्त्व दिले.

भारताने पुढे फुटबॉलमध्ये भाग घेतला. 1956 आणि 1958 च्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय संघाने number क्रमांक मिळविला होता आणि या फेरीला भारतीय फुटबॉलचा सुवर्णकाळ म्हणतात. अशा प्रकारे भारतातील फुटबॉल खेळाची लोकप्रियता वाढली.

**फुटबॉल खेळाचे स्वरूप काय आहे ? (What is the nature of the game of football?)**


फुटबॉलचा खेळ पायावर खेळला जातो, ज्यामध्ये खेळाडू पायात गोल करतात. हा खेळ गोल बॉलने खेळला जातो आणि हा खेळ पायांनी खेळला जात असल्याने त्याला फुटबॉल म्हणतात. 11 खेळाडूंचे दोन संघ असतात.

ज्यामध्ये प्रत्येक खेळाडू बॉलला दुसऱ्या संघाच्या गोलपोस्टमध्ये ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्या खेळाडूला गोल होतात आणि जर त्याने जास्त गोल केले तर विजेता तिथे असतो आणि जर दोन्ही संघांचे समान गोल झाले तर खेळ ड्रॉ होतो. हा गेम 45 मिनिटांच्या ब्रेकसह 90 मिनिटांचा आहे. जे 15 मिनिटे आहे. यावेळी, कोणताही खेळाडू जखमी झाल्यास दुखापतीच्या वेळेस हा खेळ थोड्या काळासाठी पुढे ढकलला जाऊ शकतो आणि खेळ पुन्हा सुरू होतो.

## Alumni Connect





## Talent Uncovered




भैरवनाथ यात्रेनिमित्त ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तरी आपल्या शाळेतील सहाय्यक शिक्षिका महादेवी काशीराज नागापुरे या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या होत्या.या स्पर्धेमध्ये एकूण 30 स्पर्धकांनी भाग घेतलेला होता. शाळेतील सहाय्यक शिक्षिका कुमारी महादेवी नागापुरे मॅडम यांनी कोरोना जनजागृती या विषयावर रांगोळी रेखाटन केले होते. त्यांनी खुल्या गटामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले होते. याबद्दल त्यांचे संस्थेच्या आणिआमच्या प्रशालेचे मुख्याध्यापक , शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांचे कडून हार्दिक अभिनंदन!

### Importance of Mathematics




Mathematics isn't just about numbers – rather , it's a language. The numbers are only part of the tool set we use to communicate absolute ideas of our world.

Like, learning vocabulary words of our verbal language , only learning how to spell and define words without learning how to creatively use them in communication does not enhance our ability to fully comprehend their potential power, nor our ability to share ideas with others.

Maths is a subject which develops human brain and make us stronger for facing every challenge of the world. It helps to prepare human to manage and deal with various financial and economic conditions in their path of a happy and successful life. simply, Math is about challenges, subsequently, it ends up noticeably powerful to the learners who might want to overwhelm the trials and enhance their knowledge of mathematical calculations.

In the current scenario , maths is used all over the world, ideal from the essential territories to the complicated ones, math's universally conveyed. It is used in the individual and expert field for the majority of the wage and costs that have been brought about. It is connected in various different fields likes science, financial matters, physics, economics etc. Quite each of the study field or background, students need essential understanding of numerous mathematical formulas and concepts just towards the direction of their bright and successful career.




In general mathematics, concepts are used almost every subject like science, physics, marketing and finance, biology, even while you are a student of any field of engineering or computer programming, it is must that all your mathematical concepts are clear, this is the subject which fills you up with fear, but it will become one of your favorite subjects once you understand it. It will improve percentage of intelligence.

Sneha Pawar

# ACTIVITY

**During December 2021**

Nav Krishna Valley School- Abhyaas conducted professions and industries Activity and the

'SHAPERS OF OUR FUTURE' shown their active participation. which explores the professions related to the industries. Activity tells the children about the professions associated with these industries in a pictorial way to gives them an idea about the work environment in these places.

This activity provides children with more information about the various professions and industries. Nav Krishna Valley Abhyaas is always there to explore knowledge through group activity. Overall the activity was very nice. Children were exited for group learning through this activity



Professions and industries



GENRAL HEALTH CHECK UP CAMP was organised in the school. Doctors from CIVIL HOSPITAL, sangli visited and checked the students. They also gave HEALTH TIPS to all students.

दैनिक **जनप्रवास** बातम्यांचा राजा

## नव कृष्णा व्हॅली स्कूल येथे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन



**क्रिडा स्पर्धा उद्घाटन प्रसंगी पो. उ. नि.राजू अन्नछत्रे, प्राचार्या संगीता पागनीस,सचिव विनायक जोशी,गीतांजली पाटील आदी.**

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**कुपवाड :** कुपवाड सुरज फाऊंडेशन संचलित नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यम येथे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मिरज पोलीस कार्यालयाचे पीएसआय राजू अन्नछत्रे यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष विनायक जोशी,प्राचार्य संगीता पागनीस ,उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, एच आर गीतांजली देशमुख पाटील आयटी विभाग प्रमुख राजेंद्र पाचोरे अकाउंट प्रमुख शश्रीशैल मोटगी हे उपस्थित होते. यावेळी सुरुवातीस जिल्हा व राज्य स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते ४०० मीटर ज्योत फिरविण्यात आली .नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यम च्या दिनांक २२ ते २४ अशा तीन दिवस खो-खो कबड्डी बास्केटबॉल ॲथलेटिक्स फुटबॉल क्रिकेट बुद्धिबळ कॅरम टेबल टेनिस अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे यासाठी स्कूलचे क्रीडा शिक्षक सुशांत सूर्यवंशी व नामदेव नलवडे तसेच कृष्ण पाटील यांनी स्पर्धेचे नियोजन केले. कार्यक्रमाचे स्वागत, प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रशांत चव्हाण यांनी करून दिला.

यावेळी प्रमुख पाहुणे राजू अन्नछत्रे यांनी खेळाविषयी महत्त्व सांगून सर्व विद्यार्थ्यांनी एक तरी खेळ खेळला पाहिजे असे सांगत आज मी पीएसआय झालो ते फक्त खेळामुळे झालो असे मत व्यक्त केले. सुरज स्पोर्टस् ॲकॅडमीचे सचिव विनायक जोशी म्हणाले, नव कृष्णा व्हॅली स्कूलमध्ये खेळाडूंसाठी स्वतंत्र स्पोर्टस् पॉलिसी केली आहे.

शालेय राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूला स्कूल मध्ये विशेष सवलत देण्यात येणार आहे तसेच स्कूलच्या आधी व नंतर स्पोर्टस्चे कोचेस उपलब्ध आहेत तरी पालकांनी आपल्या पाल्यास खेळात सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे असे मत व्यक्त केले .

## नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी माध्यम वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन



कुपवाड (बंधुता वृत्तसेवा) : सुरज फौंडेशन संचलीत नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी माध्यम चे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन दिनांक २९ डिसेंबर २०२१ रोजी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित आणि महाराष्ट्र व्हॉलिबॉल संघाचा माजी कर्णधार महादेवी अशोक केरीपाळे यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले.

वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी सुरज स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव विनायक जोशी, संस्थेच्या एच आर सौ. गीतांजली पाटील देशमुख, व इंग्लिश मिडीयम चे मुख्याध्यापक चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जिल्हा व राज्य स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते ४००मीटर ज्योत फिरवण्यात आली त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुख्य ज्योत प्रज्वलित करण्यात आली. १००मीटर धावण्याच्या स्पर्धेत आयोजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सोडण्यात आली. नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी माध्यम वार्षिक क्रीडा स्पर्धे चे आयोजन २९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेमध्ये खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, डॉजबॉल रस्सीखेच, रिले, धावणे इत्यादी सांघिक व विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.


प्रमुख पाहुण्या सौ. महादेवी केरीपाळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की शालेय जीवनातील खेळले जाणारे खेळ व क्रीडा स्पर्धा या आपल्या आयुष्याच्या पुढील वाटचालीस खूपच महत्त्व देतात. खेळांच्या विषयी महत्व सांगून विद्यार्थ्यांनी एक तरी खेळ खेळायला पाहिजे.

सुरज स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव माननीय विनायक जोशी सर आपले मनोगत व्यक्त करताना बोलले की नव कृष्णा व्हॅली स्कूल मध्ये खेळाडूंसाठी स्वतंत्र स्पोर्ट्स पॉलीसी केली आहे. राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूंना विशेष सवलत देण्यात येणार आहे. खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी स्कूलचे व स्पोर्ट चे प्रशिक्षक उपलब्ध आहे अरबाज जहांगीर इनामदार धनुर्विद्या प्रात्यक्षिके दाखवले, तरी पालकांनी आपल्या पाल्यास खेळात सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे.

कार्यक्रमाचे नियोजन व स्पर्धेचे आयोजन क्रीडाशिक्षक चंद्रशेखर कांबळे यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सौ . विनिता रावळ यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. सुनिता भोसले यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेचा मुख्याध्यापक, शिक्षक- आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.






कला, क्रीडा, शिक्षण प्रेमी उद्योजक मा. प्रविणशेठजी लुंकड


सुरज फौंडेशन संचलित, नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी व इंग्रजी माध्यम , सुरज स्पोर्ट्स अकॅडमी येथे दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी कला, क्रीडा, शिक्षण प्रेमी उद्योजक व सूरज फौंडेशन चे संस्थापक अध्यक्ष मा. श्री प्रविणशेठजी लुंकड यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त वर्ग सजावट स्पर्धा, श्लोक पाठांतर, बडबड गीते, भेटकार्ड बनवणे, स्मरणशक्ती स्पर्धा तसेच इंग्रजी, गणित, विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा तसेच धनुर्विद्या खेळाचे प्रात्यक्षिक सकाळी 10:30 वाजता सादर करण्यात येणार आहे.

सुरज फौंडेशनच्या माध्यमातून एम.आय.डी.सी. कुपवाड येथे १९९४ मध्ये सुरज फौंडेशनच्या रुपाने एक छोटेसे रोपटे लावले गेले. आज या रोपट्याचे वटवृक्षात मध्ये रुपांतर झालेले आहे व या वटवृक्षाचा सुगंध राज्यासह देशात व आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवळत आहे, या क्षेत्रात काम करण्यासाठी योग्य त्या शिक्षकांची नेमणूक करणे, त्यांच्याकडून योग्य पद्धतीने व बारकाईने लक्ष देऊन विद्यार्थ्यांना घडवण्याची चित्रे यातून साकारली आहेत, सुरज फौंडेशनच्या परिवारा मधून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी हे जगासमोर केवळ मार्कांच्या टक्केवारी न करता गाव, समाज, राज्य आणि देश पातळीवर त्याने नांवलौकिक मिळवला आहे.त्यांच्या कष्टाला सलाम करण्याशिवाय व मनामध्ये आदर बाळगल्याशिवाय मन राहवत नाही.

सुरज फौंडेशनच्या माध्यमातून आज सध्या कार्यरत असलेल्या पैकी नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम आणि ज्युनिअर कॉलेज, सुरज स्पोर्टस अकॅडमी, आय. आय. टी. व मेडिकल अकॅडमी. नव कृष्णा व्हॅली स्कूल मराठी व इंग्रजी माध्यम म्हैसाळ, नव कृष्णा व्हॅली स्कूल सी.बी.एस.सी स्कूल उत्तुर या सर्व माध्यमातून कोणत्याही शाखेत सहज रित्या पाहणी केली तरी एक आदर्श विद्यार्थी कसा असावा याची प्रचिती येते.

आज त्यांच्या ६६ व्या जन्मदिनीनिमित्त सुरज फौंडेशनच्या परिवारासह, मित्रमंडळी व हितचिंतकांच्या वतीने लाख लाख शुभेच्छा !!

सुरज फौंडेशन संचलित नव कृष्णा व्हॅली स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कुपवाड एमआयडीसी येथे दिनांक 26 डिसेंबर 2021 रोजी माननीय कामत साहेब सचिव सुरज फौंडेशन यांचा 73 वा वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून चीदंबरं कोटीभास्कर त्याचबरोबर सुरज फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रवीणशेठ लुंकड नूतन बुद्धिबळ मंडळाचे सचिव चिंतामणी लिमये सुरज स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव माननीय विनायक जोशी उपस्थित होते सर्वप्रथम माननीय कोटीभास्कर सर व माननीय प्रवीणशेठ जी यांनी बुके देऊन कामत सर यांचा सत्कार करण्यात आला व केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त निमंत्रित जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धा आठ वर्ष, दहा वर्ष 12 वर्ष व 16 वर्ष मुले मुली वयोगटात ब्रेस्ट रॉक फ्री स्टाइल बटर फ्लाय व बॅकस्ट्रोक अशा चार प्रकारांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच ;सोळा वर्षाखालील मुला-मुलींच्या चार बाय पन्नास मीटर च्या रिले स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण 90 विद्यार्थी सहभागी झाले होते. अतिशय चांगल्या पद्धतीने या स्पर्धा संपन्न झाल्या .यामधील ,क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या साठी ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले .तसेच ;यासाठी पंच म्हणून गौतम खाडिलकर तसेच सुरज तासगाव, नामदेव नलवडे ,शिवम भोकरे यांनी काम पाहिले स्वागत व प्रास्ताविक श्री विनायक जोशी यांनी केले त्यानंतर श्री . कामत साहेब यांनी वाढदिवस एक निमित्त आहे या दिवशी विविध स्पर्धेचे आयोजन करण्याची प्रथा सूरज फौंडेशन मध्ये आहे तसेच हा दिवस सुरज फौंडेशन फॅमिली डे म्हणून साजरा करण्यात आला याबाबत मा चिदंबर कोटीभास्कर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन जास्तीत जास्त खेळाडूंनी स्विमिंग करावे, स्विमिंग हा सर्वांगीण व्यायाम आहे असा त्यांनी प्रामुख्याने उल्लेख केला .त्याचबरोबर माननीय प्रवीण शेठ यांनी पुढील वर्षापासून विभागीय राज्य व राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्याचा निश्चय केला.




सुरज फौंडेशन सचिव एन जी कामत यांचा वाढदिवस उत्साहात साजरा